
दै. देशोन्नती दि. 15/12/2025

# बँकेतील ग्राहकांची रक्कम लुटणारी टोळी स्थागुशाच्या जाळ्यात



## नगदी ४ लाख रुपये जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यप्रदेश येथील चोऱ्या करणारी टोळी जेरबंद केली असून त्यांच्याकडून ७ गुन्हे उघड करून नगदी ४ लाख १ हजार रुपये जप्त केले.

स्थानिक गुन्हे शाखचे पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि रवि वाहुळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांच्या दोन टिम तयार करण्यात आल्या. त्यापैकी एक टिम मध्यप्रदेश येथे १० दिवस थांबून होती. दरम्यान तेथील स्थानिक पोलीसांची मदत घेवून तेथे काही ठिकाणी छापा कार्यवाही करुन आरोपींचा शोध घेण्यात आला व एक टिम नांदेड शहरात अथक परिश्रम घेवून माली गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना मध्यप्रदेश येथील टिमला नांदेड जिल्ह्यात चोरी करणारे मध्यप्रदेश येथील दोन इसम नांदेड शहरात वावरत असल्याची माहिती मिळाली.

या माहितीवरून रेल्वेस्टेशन नांदेड येथे १४ डिसेंबर रोजी सापळा लावला असता इसम अनिकेश गजेंद्र सिसोदीया (२०) रा. मवाखेडी ता. मंगावली जि. अशोकनगर (राज्य मध्यप्रदेश) व एक विधीसंर्षग्रस्त बालक हे मिळुन आले. त्यांची अंगझडती व ताब्यातील बॅगची पाहणी केली असता त्यांच्या ताब्यात एकुण नगदी रक्कम ४ लाख १ हजार रुपये मिळुन आले. त्यांना विचारपुस केली असता त्यांनी सदरचे नगदी रुपये हे त्यांचे इतर साथीदारासह मिळुन नांदेड जिल्ह्यातील अर्धापुर, हदगाव, भाग्यनगर, वजीराबाद, भोकर, किनवट व लोहा येथे केलेल्या चोऱ्यांमधील रक्कम असल्याचे सांगीतले. सदर आरोपी हे बँकेमध्ये पैसे काढणाऱ्या व्यक्तींवर पाळत ठेवुन तसेच लग्नामध्ये नजर चुकवून चोरी करण्याच्या सवयीचे आहेत. नमुद आरोपी व विधीसंर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवून मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही कामी अर्धापुर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या कारवाई पथकात पोउपनि बळीराम दासरे, माधव केंद्रे, पोहेकॉ. मिलिंद नरबाग, मोतीराम पवार, दीपक ओढणे, राजू सिटीकर, रेश्मा पठाण यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांचा समावेश होता.